

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे ‘विकेंद्रित-लोकसहभागी’ नियोजन...!

## स्थानिक व राज्य पातळीवरील निधी, संसाधन आणि आरोग्यसेवांचा नियोजन कृती आराखडा याचे लोकसहभागाने नियोजन






**प्रकाशक**


राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र
अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM)

---

साथी
(SATHI- Support for Advocacy & Training
to Health Initiatives)

ऑगस्ट २०१७

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे 'विकेंद्रित-लोकसहभागी' नियोजन...!



भाऊ - नमस्कार तात्या... कुठं निघालातं एवढ्या गडबडीत...!

तात्या - अरे, आपल्या गावात मीटिंग आहे ना नियोजनाची!

भाऊ - आं... तात्या कसलं नियोजन!

तात्या - तुला माहिती नाही काय, गाव आरोग्य नियोजनाची मीटिंग आहे ती...

भाऊ - गाव आरोग्य नियोजन...! अन् काय असतं ते!

तात्या - सांगतो..सांगतो. चल सोबत.

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे ‘विकेंद्रित-लोकसहभागी’ नियोजन...!

तात्या - हे बघ भाऊ, आपण शेतकरी... दरवर्षी पाऊस पडायच्या आधी काय करतो?

भाऊ - आपण पेरणीची तयारी करतो.

तात्या - अन् त्या आधी?





भाऊ - शेत तयार करतो, शेताला बांध घालतो, खताची व्यवस्था करतो, बी-बियाणे घेतो, पेरणीसाठी लागणारी साहित्य आधीच घेतो, हातखर्चाला थोडे पैसे पण ठेवतो.

तात्या - हां... ह्यालाच तर नियोजन म्हणतात भाऊ.

भाऊ -खरचं की तात्या, असं नियोजन तर आपण दरवर्षी करतो.

तात्या -हां... तर असंच नियोजन करायचंय आपल्याला, आपलं आणि आपल्या गावाचं आरोग्य चांगलं ठेवण्यासाठी.

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे ‘विकेंद्रित-लोकसहभागी’ नियोजन...!




भाऊ - म्हणजे नेमकं काय करायचं तात्या.

तात्या- अगदी महत्त्वाचा प्रश्न विचारलासं बघ भाऊ.

तात्या- तर भाऊ, या मीटिंगमध्ये आपल्या गावाचे आरोग्य समिती सदस्य, सरपंच, महिला, आरोग्य सेवांच्या विशेष गरजा असणारे लोक, गावातील, पाड्या-वस्तीतील लोक, आशा, अंगणवाडीताई, नर्सबाई, मलेरिया डॉक्टर (एमपीडब्लू) आणि आरोग्यावर काम करणारे कार्यकर्ते हे येणार आहेत.

भाऊ - मग...पुढे काय करायचं ?

तात्या- तर आपण सगळ्यांनी मिळून आपल्या गावाच्या आरोग्याच्या नेमक्या गरजा काय आहेत ? याची चर्चा करायची. त्यांची यादी बनवायची.



# सार्वजनिक आरोग्यसेवांचे ‘विकेंद्रित-लोकसहभागी’ नियोजन...!






भाऊ - पण तात्या, आरोग्याच्या गरजा म्हणजे?

तात्या- हे बघ... आजारी पडल्यावर तू आपल्या गावानजीकच्या सरकारी दवाखान्यात जातो की नाही?

भाऊ - हो जातो नां! सर्वांना मोफत इलाज भेटतो तिथं.

तात्या- हां! तर मग त्या दवाखान्यात आणि आपल्या गावात अजून नेमक्या कोणत्या सेवा-सुविधा भेटल्या पाहिजे, आपल्या नेमक्या गरजा काय हे सांगायचं.


भाऊ - एवढचं नां! मग सांगू की सर्व, गावात ते मलेरिया डॉक्टर लवकर येत नाहीत, पोरांना लस टोचायला लांब दुसऱ्या पाड्यात जावं लागतं.

आणि... आजारी पडल्यावर दवाखान्यात जातो, तिथं बऱ्याच वेळा प्यायला पाणीच नसते, स्वच्छता नसते, संडास-बाथरूम बंदच, कारण काय? तर म्हणे ब्लॉक झालेत आणि सगळ्या टेस्ट (प्रयोगशाळा तपासण्या) पण नाही करत. असं बरचं काय काय आहे बघा तात्या.


तात्या- अगदी बरोबर.

भाऊ - पण तात्या पुढे त्या गरजांच्या यादीचे काय करायचं...

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे ‘विकेंद्रित-लोकसहभागी’ नियोजन...!





तात्या - नियोजन कृती आराखडा आणि बजेट...!

भाऊ - आराखडा आणि बजेट.. ? हे काय नवीन आता ?

तात्या - अरे भाऊ, आराखडा म्हणजे, आपण सांगितलेल्या गरजांसाठी एक फाईल तयार करणे, किती लोकांना किंवा रुग्णांना फायदा होईल याचा तपशील देणे आणि ती गरज कशी पूर्ण करता येईल याची तपशीलवार माहिती लिहिणे. याला ‘नियोजन कृती आराखडा’ म्हणतात.

समजलं! आणि बजेट म्हणजे लोकांकडून आलेल्या गरजा मिळवून देण्यासाठी किती पैसे (निधी) लागतील याचा अंदाजित आकडा ठरवणे.

(थोडक्यात, आलेल्या गरजांचे रूपांतर बजेटमध्ये करणे)

भाऊ - पण... तात्या, आपल्याला कुठे हे सर्व करता येतं.

तात्या - अगदी मुद्याचं बोलला भाऊ तू. हे आराखडे आणि बजेट आपण नाहीच करणार, ते सर्व डॉक्टर आणि त्यांची यंत्रणा करेल. आपण फक्त आपल्या गरजा सांगायच्या आणि पैसे न लागणाऱ्या गरजा कोणत्या ज्या आपण पूर्ण करू हे सांगायचे.

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे 'विकेंद्रित-लोकसहभागी' नियोजन...!





भाऊ- तात्या भारीच आहे की हे... म्हणजे सरकार आपल्याला त्यांच्या या नियोजनात सहभागी करून घेतयं म्हणजे.

तात्या- हो ना भाऊ, आतापर्यंत आपल्याला या नियोजन प्रक्रियेत सहभागी न करताच हे सर्व नियोजन डॉक्टर आणि त्यांची यंत्रणा करत होती. वरून सरकारचं पत्र आले की, मागील वर्षाच्या आकड्यांवरून चालू वर्षाचे आराखडे भरून पाठवले जात होते. कारण त्यांनाही कुठे एवढा टाईम मिळत होता.

भाऊ- पण तात्या तेही बरोबर आहे ना? सरकारी लोकांनीच करायला पाहिजे हे काम.

तात्या- हा पूर्ण गैरसमज आहे भाऊ तुझा. डॉक्टर आणि त्यांची यंत्रणा यांनीच नियोजन केले तर आपल्या गरजांचा विचार कसा होणार... असे बरेच समज-गैरसमज आहेत...

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे 'विकेंद्रित-लोकसहभागी' नियोजन...!



# सार्वजनिक आरोग्यसेवांचे ‘विकेंद्रित-लोकसहभागी’ नियोजन...!



# सार्वजनिक आरोग्यसेवांचे 'विकेंद्रित-लोकसहभागी' नियोजन...!




भाऊ- आता तर चांगलचं लक्षात आलं बघा तात्या, आणि अजून काय-काय नियोजन करता येतं आपल्या मार्फत?

तात्या- आपल्याला सगळचं नाही जमणार, पण आपल्या भागासाठी आपणसुद्धा नवीन आरोग्याच्या योजना सांगू शकतो.

भाऊ- आरोग्याच्या नवीन योजना! आन् आपण त्यात काय सांगणार?

तात्या- जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जीवनदायी आरोग्य विमा योजना, राष्ट्रीय किशोरी स्वास्थ्य कार्यक्रम या राष्ट्रीय योजनांप्रमाणे आपणही एखादी नावीन्यपूर्ण योजना मांडू शकतो. ज्यामुळे आपल्या भागातील जास्तीत जास्त लोकांना याचा फायदा होईल.

भाऊ- म्हणजे तात्या?

तात्या- हे बघ भाऊ, आपल्या आदिवासी भागातील आरोग्य केंद्रात बाळंतपणासाठी आलेल्या प्रत्येक मातेला १५ दिवस मोफत आहार, आरोग्य केंद्रात रुग्णांच्या नातेवाईकांसाठी स्वयंपाक घर अशा योजना आपण स्थानिक पातळीवर नक्कीच राबवू शकतो...




# सार्वजनिक आरोग्यसेवांचे ‘विकेंद्रित-लोकसहभागी’ नियोजन...!

भाऊ - याला म्हणतात होय आरोग्यसेवांचं नियोजन...!

तात्या - हो. नुसतं नियोजन नाही तर, या सर्व प्रक्रियेला लोकसहभागी-विकेंद्रित नियोजन असं म्हणतात. हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

भाऊ - तात्या नुसतं नियोजन आणि लोकसहभागी-विकेंद्रित नियोजन यात काय फरक आहे हो.

तात्या- ...खूप फरक आहे...



## हे बघ...

आता आपण ‘केंद्रित नियोजन आणि लोकसहभागी-विकेंद्रित नियोजन’ यामध्ये काय फरक आहे ते पुढे बघुयात!...

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे ‘विकेंद्रित-लोकसहभागी’ नियोजन...!

## केंद्रित नियोजन आणि लोकसहभागी-विकेंद्रित नियोजन यातील फरक

### केंद्रित नियोजन



प्रशासनच केंद्रस्थानी असते.







केंद्र, राज्य पातळीवरून निर्णय खाली गावापर्यंत येतात.



एकाच अधिकारी /व्यक्तीला अधिकार आणि जबाबदारी दिली जाते.

### विकेंद्रित नियोजन



लोक केंद्रस्थानी असतात.



स्थानिक पातळीवर उपस्थित झालेल्या गरजांचे रूपांतर बजेटमध्ये करून मंजुरीसाठी पाठवले जाते.



जास्तीत-जास्त लोकांकडे जबाबदाऱ्या दिल्या जातात. अधिकार कोणाला द्यायचे हे लोक ठरवतात.

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे 'विकेंद्रित-लोकसहभागी' नियोजन...!

## केंद्रित नियोजन आणि लोकसहभागी-विकेंद्रित नियोजन यातील फरक

### केंद्रित नियोजन



निर्णय प्रक्रियेत फक्त शासकीय यंत्रणाच असल्यामुळे लोकांच्या वतीनेही अधिकारी आणि कर्मचारीच निर्णय घेतात. त्यामुळे एककल्ली विचार होण्याची शक्यता जास्त.



या प्रक्रियेत नियोजनाबाबत लोकांची, लोकप्रतिनिधींची, वेगवेगळ्या समितींची क्षमताबांधणी होतंच नाही.

### विकेंद्रित नियोजन



मुख्य निर्णय लोकांमार्फत आलेल्या गरजांवरच घेतले जातील यावर जास्त भर दिला जातो.




नियोजनाबाबत लोकांची क्षमताबांधणी व त्यांची समज वाढवली जाते.

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे ‘विकेंद्रित-लोकसहभागी’ नियोजन...!






तात्या - दुसरा टप्पा म्हणजे आपण आणि लोकांनी सांगितलेल्या गरजांची प्राथमिकता ठरवणे आणि त्यांचे विश्लेषण करणे.


भाऊ - प्राथमिकता? आणि विश्लेषण करणे म्हणजे काय हो तात्या.

तात्या - आपल्या गावातून, अन् लोकांकडून सांगितलेल्या गरजांची यादी समोर ठेवून, कोणती गरज आधी पूर्ण करायची, कधी करायची, किती रुग्णांना फायदा होईल याची नोंद करणे.

भाऊ - पण कोण करणार हे काम...

तात्या - आपल्यासारखे काही माहिती असलेले लोक आणि सरकारी अधिकारी मिळून आपल्या आरोग्य केंद्रात एकत्र बसून विश्लेषण करून एक फाईल तयार करतील. त्याला सरकारी भाषेत ‘प्रस्ताव’ म्हणतात.

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे 'विकेंद्रित-लोकसहभागी' नियोजन...!



भाऊ - तात्या... या प्रस्तावाच्या फाईलचे पुढे काय होते हो, कुठे द्यायचे असते ते?

तात्या - अगदी महत्वाचा प्रश्न आहे भाऊ... सर्व तालुक्यांतून आलेले प्रस्ताव पाहून लोकांच्या गरजांना जिल्ह्याच्या ठिकाणी महत्त्वाचे निर्णय घेणे. हा तिसरा टप्पा.

भाऊ - नेमकं या टप्प्यात काय केलं जातं हो तात्या...

तात्या - हे बघ..!

या तिसऱ्या टप्प्यात खालीलप्रमाणे त्याचे तीन भाग केले जातात.

१. निधी (पैसे) /बजेटमधून सुटू शकणाऱ्या लोकांच्या मागण्या/गरजा

२. सध्याच्या यंत्रणेमध्ये समन्वयाची गरज असलेल्या मागण्या/गरजा

३. स्थानिक पातळीवरील लोकसहभागातून नियोजन केल्यास पूर्ण होऊ शकणाऱ्या मागण्या/गरजा




त्याप्रमाणे नोंद करून निधी (पैसे)/बजेटमधून सुटू शकणाऱ्या लोकांच्या मागण्या/गरजा यांची फाईल वर राज्याला पाठवली जाते. आणि बाकी दोन प्रकारच्या फाईल संबंधित त्या-त्या विभागाच्या लोकांकडे सोपवली जाते.

# सार्वजनिक आरोग्यसेवांचे 'विकेंद्रित-लोकसहभागी' नियोजन...!

भाऊ - अरे! झाले की मग आपले काम...काही आपण करायचे आणि काही अधिकारी कर्मचारी यांनी...

तात्या - हो झाले! पण एक शेवटचा चौथा टप्पा राहिला की भाऊ...!

भाऊ - आता! कोणता टप्पा राहिला हो तात्या.

तात्या - आपण पाठवलेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा..!


भाऊ - आता ते कसे करणार बरं आपण...!

तात्या - अरे खूप सोप्पं आहे. हे बघ...



आपण आपल्या मागण्या/गरजा तीन भागात केल्या की नाही त्याप्रमाणे, निधी/बजेटचे जे प्रस्ताव आहेत त्याचं पुढे काय झालं हे जिल्ह्याचे अधिकारी राज्याला विचारतील.

आणि सध्याच्या यंत्रणेमध्ये समन्वयाची गरज असलेल्या मागण्या/गरजा व आपल्या सहभागातून नियोजन केल्यास पूर्ण होऊ शकणाऱ्या मागण्या/गरजा याचं काय झालं हे आपण पाहायचं किंवा ज्यांनी जबाबदारी घेतली त्यांना विचारायचं.



आता...पूर्ण झाले भाऊ. आपल्या आरोग्याचे लोकसहभागी विकेंद्रित नियोजन..!

भाऊ - आभारी आहे तात्या..खरच खूप महत्त्वाची माहिती मिळाली बरं का, आता मी नक्की या नियोजन प्रक्रियेत सहभागी होईल याची खात्री देतो.